# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २६.०१.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २५/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २५३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १,५१,३००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. २५/०१/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०३ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण १४,४००/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि. २५/०१/२०२३ रोजी पोस्टे कळमनुरी येथे ०१ इसमाविरूध्द कलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले असुन पुढील तपास पोलीस करित आहेत.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २५/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०२ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**ई सी ॲक्ट सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. २५/१२/२०२२ रोजी फिर्यादी माधव गणपत भडके वय ३८ व्य नौकरी ने पोस्टे कळमनुरी यांचे फिर्यादी वरून पोस्टे कळमनुरी येथे कलम भादवी कलम ३२८,२७२,२७३,१८८ भादवी सहकलम २६(२)(पअ),२७(२)(म),३०(२),५९ अन्नसुरक्षा व मानके अधि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन यातील नमुद आरोपीने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध केलेला गुटखा व मानवी जिवीतास धोका असलेले पान मसाले विक्री करण्याच्या उददेशाने स्वताचे ताब्यात बाळगतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे व पुढील तपास कळमनुरी पोलीस करित आहेत.

**अपघात दाखल गुन्हे:—**

दि.२५/०१/२०२३ रोजी पोस्टे गोरेगाव येथे ०१ अपघाताचा गुन्हा कलम २७९,३३७,३३८,४२७९,३३७,३३८ २७ भादवी प्रमाणे दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**फसवणुक संदर्भाने दाखल गुन्हेः—**

दि.२५/०१/२०२३ रोजी पोस्टे हटटा येथे ०२ गुन्हे कलम ४०९, ४२०, ४६७, ४६८, ४७१,१६६,१६७,३४ भादवी प्रमाणे दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**दुखापत दाखल गुन्हेः—**

दि. २५/०१/२०२३ रोजी पोस्टे गोरेगाव आ.बाळापुर येथे प्रत्येकी ०१ असे एकुण ०२ गुन्हे कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ भादवी कलमान्वये गुन्हे दाखल असुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.